|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

# NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON– 425001

## P.B.NO.80, Umavinagar, JALGAON.

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र.उमवि/०५/बृहत आराखडा-विस्तार/१४४/२०१७ दिनांक २५.०३.२०१७

प्रति,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य
तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.........

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नव्याने होऊ घातलेल्या बृहत आराखड्यासाठी नवीन अभ्यासक्रम, नवीन विषय, अतिरिक्त तुकडी आणि उपकेंद्र (Satellite Centres) इत्यादिंच्या विस्तारासाठी दिनांक ०५.०३.२०१५ पावेतो विहीत प्रपत्रात माहिती सादर करणेबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०७, १०९(१) आणि १०९ (४) (a).
२) विद्यापीठाचा पाच वर्षांचा बृहत आराखडा तयार करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलले शासन निर्णय/पत्र/परिपत्रक आणि मा.डॉ.नरेंद्र जाधव समितीचा अहवाल, सहपत्र आणि निकष.

महोदय/महोदया,

वरील संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की, नव्याने लागू करण्यांत आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील संदर्भिय तरतूदी तसेच अकृषी विद्यापीठांच्या आराखड्याबाबत शासनाचे ध्येयधोरण, त्यासंदर्भात शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय/पत्र/परिपत्रक आणि बृहत आराखड्याबाबत डॉ.नरेंद्र जाधव समितीचा अहवाल, त्यासोबत जोडलेले सहपत्र तसेच आराखडा तयार करतांना विचारात घ्यावयाचे निकष इत्यादि बाबींचा साकल्याने अभ्यास करुन, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षांसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा बृहत आराखडा (उद्दिष्टनिष्ठ आराखडा) नव्याने तयार करण्यासाठी एक समिती गठीत केलेली आहे. संदर्भिय क्र.०२ मध्ये नमूद केलेल्या बाबी आपल्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडल्या आहेत.

आजच्या जागतिकीकरण व संगणकीकरणाच्या काळात उमवि अधिक्षेत्रातील जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील युवक/युवतींना चारित्र्यसंपन्न व प्रगल्भ नागरिक बनविणेसाठी तसेच त्यांचे उद्याचे आर्थिक व व्यावसायिक जीवन संपन्नमय व प्रगतीशील होण्यासाठी विद्यापीठाच्या अधिकारितेतील सेवारहित व न्यूनविकसित क्षेत्रांच्या गरजांचा योग्य तो विचार करुन उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वसमावेशक, समन्यायी वाटप होण्याच्यादृष्टीने आणि विद्यापीठाचा व पर्यायाने राष्ट्राचा विकास होण्याच्यादृष्टीकोनातून युवक/युवतींना अधिक दर्जेदार, गुणवत्तापुर्ण तसेच व्यवसायाभिमुख उच्च शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. आजचे शिक्षण, उच्च शिक्षणाप्रती असलेल्या अपेक्षा, भविष्यात लागणारा नोकरवर्ग कशा प्रकारचा असावा आदि बाबी तसेच जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील भौगोलिक स्थितीचा अभ्यास करुन विद्यापीठ परिक्षेत्रात कोणकोणते अभ्यासक्रम सुरु करणे अपेक्षित आहे, हे जाणून घेण्यासाठी जिल्हानिहाय सर्वेक्षण करणेसाठीदेखील विद्यापीठामार्फत ०३ स्वतंत्र समित्यांची नियुक्ती केलेली आहे त्याचप्रमाणे विद्यापीठाचा सदर आराखडा सर्वसमावेशक होण्यासाठी समाजातील विविध समाजसुधारक तसेच पालक, शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षणतज्ज्ञ इत्यादि घटकांकडून दिनांक ०५.०४.२०१७ पावेतो सूचना (suggestions) मागविण्यांत आलेल्या आहेत.

विद्यापीठाच्या नव्याने होऊ घातलेल्या बृहत आराखड्यात, नवीन महाविद्यालयांच्या स्थाननिश्चिती बरोबरच नवीन अभ्यासक्रम, नवीन विषय, अतिरिक्त तुकडी आणि उपकेंद्र (Satellite Centres) इत्यादिंच्या विस्तारासाठीदेखील, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूद विचारात घेता, समावेश करणे क्रमप्राप्त आहे.

उपरोक्त अनुषंगाने कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षांत आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थेत कोणकोणते नवीन अभ्यासक्रम, नवीन विषय, अतिरिक्त तुकडी आणि उपकेंद्र (Satellite Centre) विस्तारांतर्गत सुरु करणार आहात, याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षनिहाय नियोजन करुन, त्यासंदर्भातील परिपूर्ण माहिती सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात भरुन विद्यापीठाच्या संलग्नता विभागास **दिनांक ०५.०४.२०१५ पावेतो समक्ष सादर करावी**. आपल्याकडून सादर होणारी संबंधित माहिती, बृहत आराखडा तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीसमोर सादर करण्यांत येऊन सदर समितीच्या शिफारशीअंती तसेच विद्यापीठ प्राधिकरणाच्या निर्णयानुसार त्यावर अंतिम कार्यवाही करण्यांत येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

कृपया उपरोक्तसंदर्भात विहीत मुदतीत कार्यवाही करण्यांत यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
Sd/xxx
(डॉ.आर.जे. वळवी)
सचिव, बृहत आराखडा समिती तथा,
उपकुलसचिव, संलग्नता विभाग,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

सोबत:- विहीत प्रपत्र.

**विहीत प्रपत्र** (नवीन अभ्यासक्रम, नवीन विषय, अतिरिक्त तुकडी आणि उपकेंद्र इत्यादिंच्या विस्ताराबाबत सादर करावयाची माहिती)
(संदर्भ:-विद्यापीठाचे पत्र क्र.उमवि/०५/बृहत आराखडा-विस्तार/१४४/२०१७, दिनांक २५.०३.२०१७)

| संलग्नीत महाविद्यालयाचे/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे संपूर्ण नांव:- | |
|---|---|

| विस्तारासाठी मागणी केलेले वर्ष | विस्ताराचा प्रकार | | | | अभिप्राय/शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | नवीन अभ्यासक्रम (New Course) | नवीन विषय (New Subject) | अतिरिक्त तुकडी (Additional Division) | उपकेंद्र (Satellite Centre) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २०१७-१८ | | | | | |
| २०१८-१९ | | | | | |
| २०१९-२० | | | | | |
| २०२०-२१ | | | | | |
| २०२१-२२ | | | | | |

महाविद्यालयाचे सिल

स्वाक्षरी/XXX
प्राचार्य/संचालक,
महाविद्यालयाचे/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे नांव